# भारताच्या विजयात अष्टपैलूंची चमक

## चौथ्या ट्वेन्टी-२० सामन्यात ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी मात

**वृत्तसंस्था, करारा**



**भारतीय संघाचा** मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या अधिकाधिक अष्टपैलू खेळविण्याच्या योजनेला अखेर यश आलेच. आव्हानात्मक खेळपट्टीवर वॉशिंग्टन सुंदर (१२ धावा व ३ बळी), अक्षर पटेल (नाबाद २१ धावा व २ बळी) आणि शिवम दुबे (२२ धावा व २ बळी) या अष्टपैलूंच्या निर्णायक कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने चौथ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात गुरुवारी यजमान ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी मात केली.

गोल्ड कोस्ट येथे झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिल्यानंतर भारताने २० षटकांत ८ बाद १६७ अशी धावसंख्या उभारली. याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ १८.२ षटकांत ११९ धावांतच गारद झाला. त्यामुळे भारताने हा सामना जिंकत मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. केवळ एकच सामना शिल्लक असल्याने आपल्याला मालिका गमवावी लागणार नाही हेसुद्धा भारताने सुनिश्चित केले.

करारा ओव्हलच्या खेळपट्टीने मधल्या षटकांत फलंदाजांची कसोटी पाहिली. भारताने सातव्या षटकात बिनबाद ५६ धावांची मजल मारली होती. मात्र, त्यानंतर भारताची धावगती मंदावली. हेच चित्र ऑस्ट्रेलियाच्या डावातही पाहायला मिळाले. ऑस्ट्रेलियाचा संघ आठव्या षटकाअंती १ बाद ६२ अशा सुस्थितीत होता. मात्र, पुढच्या षटकात डावखुरा फिरकीपटू अक्षरने जोश इंग्लिसला (१२), तर त्याच्या पुढच्या षटकात मध्यमगती गोलंदाज शिवम दुबेने कर्णधार मिचेल मार्शला (३०) माघारी धाडले. त्यानंतर ऑस्ट्रेलियाची पडझड सुरू झाली. एकवेळ ३ बाद ९१ अशी धावसंख्या असणाऱ्या ऑस्ट्रेलियाने पुढील सात गडी २८ धावांतच गमावले. गेल्या सामन्यात तडाखेबंद फलंदाजी करणाऱ्या टीम डेव्हिडचा (१४) अडसर दुबेनेच दूर केला. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने ऑस्ट्रेलियाच्या डावातील १७व्या षटकात ऑफ-स्पिनर वॉशिंग्टन सुंदरकडे पहिल्यांदा चेंडू सोपवला. त्याने या षटकात सलग दोन चेंडूंवर मार्कस स्टोइनिस (१७) आणि झेवियर बार्टलेट (०), तर आपल्या पुढील षटकात ॲडम झॅम्पाला (०) माघारी धाडत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

त्याआधी, भारतासाठी शुभमन गिल (३९ चेंडूंत ४६) आणि अभिषेक शर्मा (२१ चेंडूंत २८) यांनी डावाची आक्रमक सुरुवात केली. मात्र, 'पॉवरप्ले'नंतरच्या षटकात लेग-स्पिनर झॅम्पाच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात अभिषेक बाद झाला. त्यानंतर फिरकीपटूंविरुद्ध मोठे फटके मारण्यासाठी दुबेला (१८ चेंडूंत २२) तिसऱ्या क्रमांकावर बढती देण्यात आली. परंतु ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मार्शने चतुराई दाखवताना दुबेविरुद्ध फिरकीपटूंना गोलंदाजी देणे टाळले. ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी 'स्लोवर' चेंडूचा खुबीने वापर करत दुबे आणि गिलला फटकेबाजी करण्यापासून रोखले. 'पॉवरप्ले' संपताना १८ चेंडूंत २६ धावांवर खेळणारा गिल पुढील २१ चेंडूंत २० धावाच करू शकला. त्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव (१० चेंडूंत २०), वॉशिंग्टन (७ चेंडूंत १२) आणि अक्षर (११ चेंडूंत नाबाद २१) यांनी काही मोठे फटके मारल्याने भारताला १६५ धावांचा टप्पा ओलांडता आला.

### संक्षिप्त धावफलक

**भारत** : २० षटकांत ८ बाद १६७ (शुभमन गिल ४६, अभिषेक शर्मा २८, शिवम दुबे २२, अक्षर पटेल नाबाद २१; नेथन एलिस ३/२१, ॲडम झॅम्पा ३/४५) **विजयी वि.**
**ऑस्ट्रेलिया** : १८.२ षटकांत सर्वबाद ११९ (मिचेल मार्श ३०, मॅथ्यू शॉर्ट २५, मार्कस स्टोइनिस १७; वॉशिंग्टन सुंदर ३/३, अक्षर पटेल २/२०, शिवम दुबे २/२०)
■ **सामनावीर** : अक्षर पटेल

# अखंड भारताचे प्रतिबिंब; राष्ट्रपतींकडून महिला क्रिकेटपटूंचे कौतुक

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**



**एकदिवसीय विश्वचषक** क्रिकेट स्पर्धेत विजेतेपद मिळविणारा महिला संघ हा अखंड भारताचे प्रतिबिंब असल्याचे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढले. विश्वविजेत्या भारतीय महिला संघाने गुरुवारी राष्ट्रपती भवनात मुर्मू यांची भेट घेतली. यावेळी राष्ट्रपतींनी संघातील मुलींशी संवाद साधला.

''संघामध्ये वेगवेगळ्या प्रदेशांचे, सामाजिक पार्श्वभूमी, परिस्थिती आणि संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मुली होत्या. मात्र, त्या सर्व एक संघ म्हणून खेळल्या. त्यांनी संपूर्ण स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी केली. त्या अखंड भारताचे प्रतिबिंबच ठरतात,'' असे मुर्मू म्हणाल्या.

''उपांत्य फेरीत सात वेळच्या विश्वविजेत्या ऑस्ट्रेलिया संघावर मात करताना त्यांनी त्यांच्या क्षमतेवरील विश्वास बळकट केला. तरुण पिढी, विशेषतः मुली या विजेतेपदाने केवळ खेळाच्याच मैदानात नाही, तर जीवनातही पुढे जाण्यासाठी प्रेरित होतील,'' असेही त्या म्हणाल्या. राष्ट्रपती मुर्मू यांनी मुलींच्या मानसिकतेचेही कौतुक केले. ''विश्वचषकासारख्या महत्त्वाच्या स्पर्धेत एकवेळ त्यांची झोपही उडाली असेल. मात्र, त्या डगमगल्या नाहीत. समोर आलेल्या प्रत्येक आव्हानावर त्यांनी मात केली. आमच्या मुलीच जिंकतील हा जनतेचा दृढ विश्वास त्यांनी आपल्या अजोड कामगिरीने सार्थ ठरवला,'' असे मुर्मू यांनी नमूद केले. या वेळी भारतीय महिला संघाच्या वतीने सर्व खेळाडूंची स्वाक्षरी असलेली जर्सी कर्णधार हरमनप्रीत कौर हिने राष्ट्रपती मुर्मू यांना प्रदान केली.




# ट्वेन्टी-२० विश्वचषकाचाही अंतिम सामना अहमदाबादमध्ये?

**नवी दिल्ली :** दोन वर्षांपूर्वी पुरुषांच्या एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम लढतीचे यजमानपद भूषविलेल्या अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमला आता पुढील वर्षीच्या ट्वेन्टी-२० विश्वचषकाच्या अंतिम लढतीच्या आयोजनाचा मान मिळण्याची शक्यता आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) या स्पर्धेतील सामन्यांसाठी अहमदाबाद, मुंबई, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नई या पाच शहरांचा प्रस्ताव ठेवला आहे. याबाबतचा अंतिम निर्णय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) घेईल.

२०२३ सालच्या एकदिवसीय विश्वचषकाचे संपूर्ण यजमानपद भारताकडेच होते. त्यावेळी १० विविध शहरांत सामने खेळविण्यात आले होते. पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषकाचे आयोजन हक्क भारताकडे असले, तरी पाकिस्तानचे सामने श्रीलंकेत खेळवले जातील. श्रीलंकेतील तीन केंद्रांवर हे सामने होतील, ज्यात कोलंबोचाही समावेश असेल. या स्पर्धेचे वेळापत्रक 'आयसीसी' पुढील आठवड्यात जाहीर करेल असे समजते. विश्वचषकाला ७ फेब्रुवारीपासून सुरुवात होणे अपेक्षित असून अंतिम लढत ८ मार्चला खेळवली जाईल.

भारतीय संघ स्पर्धेत गतविजेता म्हणून उतरेल. गतवर्षी जूनमध्ये बार्बाडोस येथे झालेल्या अंतिम लढतीत भारताने दक्षिण आफ्रिकेला पराभूत केले होते. पुढील वर्षीच्या स्पर्धेतही संभाव्य विजेत्यांच्या यादीत भारताला पहिली पसंती मिळत आहे. या स्पर्धेतील सामन्यांसाठी बीसीसीआयने 'टियर-१'मधील पाच शहरांना पसंती दिली आहे.

### ...तर श्रीलंकेत सामना

ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना १ लाख ३२ हजार आसनक्षमता असलेल्या अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळविण्याचे 'बीसीसीआय'चे नियोजन आहे. मात्र, पाकिस्तानने अंतिम फेरी गाठल्यास हा सामना श्रीलंकेतील मैदानावर खेळवला जाईल.

# रैना, धवनची मालमत्ता जप्त

**नवी दिल्ली :** बेकायदेशीर ऑनलाइन सट्टेबाजी संकेतस्थळाशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार (मनी लॉन्डरिंग) प्रकरणाच्या चौकशीचा भाग म्हणून सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) माजी क्रिकेटपटू सुरेश रैना आणि शिखर धवन यांची ११.१४ कोटी रुपयांची मालमत्ता गुरुवारी जप्त केली.

'वनएक्सबेट' नावाच्या ऑनलाइन बेटिंग संकेतस्थळाविरुद्धच्या प्रकरणात शिखर धवनची ४.५ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता, तर रैनाकडून ६.६४ कोटी रुपयांचे म्युच्युअल फंड जप्त करण्याचा तात्पुरता आदेश जारी करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या दोन्ही क्रिकेटपटूंनी 'वनएक्सबेट' आणि त्याच्याशी संबंधित परदेशी संस्थांच्या जाहिरातीसाठी 'जाणूनबुजून' करार केल्याचे चौकशीदरम्यान आढळून आले आहे.

ई-लिलावाचे शुद्धिपत्रक
प्रसिद्धी दिनांकित २६.१०.२०२५
**श्री गणेश स्टॅम्पिंग्ज प्रायव्हेट लिमिटेड**
**सीआयएन: यू३१९०२पीएन२०१०पीटीसी१३५२९९**
**(मान. एनसीएलटी, मुंबई ह्यांचा आदेश दिनांकित ०६.१२.२०२२ अनुसार परीसमापन अंतर्गत कंपनी)**
**नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. एल-१३५/५/२ एमआयडीसी इंडस्ट्रीयल क्षेत्र, अहमदनगर, महाराष्ट्र, भारत – ४१४१११.**

दि. २५.१०.२०२५ रोजी लोकसत्तेत प्रकाशित झालेल्या ई-लिलाव प्रकाशनात काही त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे, ज्यामध्ये २६.१०.२०२५ रोजी सुधारणा करण्यात आली होती.
दै. लोकसत्तेच्या अहमदनगर आवृत्तीच्या दि. २६.१०.२०२५ मध्ये पर्याय बी साठीच्या लिलावाची वेळ **०३:०० वा. ते सायं. ०४:०० वा. पर्यंत** असे प्रसिद्ध झाले असून त्याऐवजी पर्याय "बी" साठी लिलावाची वेळ दुपारी **४:३० ते सायंकाळी ५:३०** पर्यंत अशी वाचण्याची विनंती करण्यात येत आहे.
दि. २६.१०.२०२५ रोजी प्रकाशित झालेल्या इतर सर्व मजकूर पूर्वीप्रमाणेच राहील. या संदर्भात झालेल्या गैरसोयीबद्दल दिलगीर आहोत.

**मनोज कुमार मिश्रा**
परीसमापक म्हणून कार्यरत
मे. श्री गणेश स्टॅम्पिंग्ज प्रायव्हेट लिमिटेड
**आयपी नोंदणी क्रमांक:** आयबीबीआय/आयपी ए-००१/आयपी-पी/०११५२/२०१९/११९०२
एएफए ३१.१२.२०२५ पर्यंत वैध.
**नोंदणीकृत पत्ता:** ऑफिस क्रमांक १३/१४, दुसरा मजला, ८४/ ढोलकवाला इमारत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई, एमएच - ४०० ००१
**नोंदणीकृत ईमेल आयडी:** ipmanojkumarmishra@gmail.com
**पत्रव्यवहार ईमेल आयडी:** liquidation.ganesh@gmail.com

दिनांक: ०६/११/२०२५
ठिकाण: मुंबई

**ॲक्सिस बँक लि.**

**गहाण ठेवण्यात आलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करण्यासाठी जाहीर सूचना**

विशेष करून कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या खात्यांमधील गहाणतारण ठेवण्यात आलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव खाली नमूद करण्यत आलेल्या बँकेच्या शाखांमध्ये करण्याचे नियोजित करण्यात आले आहे.
खाली नमूद करण्यात आलेल्या कर्जदारांनी ॲक्सिस बँक लि. यांच्याकडे सोन्याचे दागिने गहाण ठेवून कर्ज सुविधा ('सोने तारण कर्ज सुविधा') प्राप्त केली आहे. सदर सोने तारण कर्जाची येणे बाकी रक्कमेची परतफेड करण्यासाठी सदर कर्जदार/जामीनदार यांना मागणी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. जसे की, कर्जदार/जामीनदार यांनी येणे बाकी रक्कमेची परतफेड केलेली नाही, त्यामुळे बँकेस सदर तारणाचा वापर करून गहाण ठेवण्यात आलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा विशेषतः पुढील परिशिष्टात नमूद करण्यात आलेल्या दागिन्यांचा **दि. १७/११/२०२५ रोजी दुपारी १२.३० ते ३.३० दरम्यान ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे, जसे आहे,'' ''तेथे जे काही आहे,''आणि ''कोणताही फेरविचार नाही''** या तत्त्वावर ई-लिलाव करणे भाग आहे. कर्जदार आणि त्यांच्याकडून येणे असलेल्या रक्कमेचा तपशील पुढीलप्रमाणे :

| ग्राहकाचे नांव | कर्ज खाते क्र. | येणे रक्कम (रु.) | रिकॉल नोटीसीची तारीख | एकूण वजन | निव्वळ वजन |
|---|---|---|---|---|---|
| **शाखेचे नाव : अहमदनगर (महाराष्ट्र)** | | | | | |
| तारनूम अलम खान | xxxxxxxxxxx५२७५ | २३१६९७.०० | २७/०९/२०२५ | ४६.२०० | ४३.८०० |
| **शाखेचे नाव : कोपरगांव केओपीए (महाराष्ट्र)** | | | | | |
| गौरव अण्णासाहेब काळे | xxxxxxxxxxx४१४४ | ९७६९५.९० | २५/०३/२०२५ | १९.२०० | १९.००० |
| संतोष सीताराम जोर्वेकर | xxxxxxxxxxx६५६५ | ३४६३३४.०० | २९/०९/२०२५ | १००.२०० | ७५.३०० |
| सविता माधव फुलारे | xxxxxxxxxxx७४९५ | २२१११.०० | ३१/०७/२०२५ | १०.५०० | १०.००० |

कोणतीही पूर्वसूचना न देता खाते बंद करण्याचा / लिलावाची तारीख बदलण्याचा अधिकार ॲक्सिस बँक लि. यांना आहे. लिलाव ऑनलाईन पद्धतीने **https://gold.samil.in** या वेबसाईटवर दुपारी १२.३० ते ३.३० दरम्यान करण्यात येईल.
सविस्तर अटी आणि शर्तींसाठी कृपया **https://gold.samil.in** या वेबसाईटवर लॉगइन करा.

**ठिकाण : महाराष्ट्र**

**अधिकृत अधिकारी**
**ॲक्सिस बँक लि.**

# सेवा क्षेत्र वाढीचा दर पाच महिन्यांच्या नीचांकी

**पीटीआय, नवी दिल्ली**

**देशातील काही** भागात निर्माण झालेला स्पर्धात्मक दबाव आणि लांबलेला पाऊस तसेच अतिवृष्टीमुळे उत्पादनातील मंदावलेल्या वाढीमुळे ऑक्टोबरमध्ये सेवा क्षेत्र वाढीचा दर पाच महिन्यांतील नीचांकी पातळीवर रोडावला, असे गुरुवारी जाहीर झालेल्या मासिक सर्वेक्षणाने स्पष्ट केले.

भारतातील सेवा व्यवसायातील खरेदी व्यवस्थापकांचा कल दर्शविणारा 'एचएसबीसी इंडिया सर्व्हिसेस पीएमआय' निर्देशांक ऑक्टोबर महिन्यात ५८.९ गुणांवर नोंदला गेला. सप्टेंबरमध्ये हा गुणांक ६०.९ गुणांवर होता. निर्देशांकाची ही मे महिन्यानंतरची नीचांकी पातळी आहे. सेवा क्षेत्राचा निर्देशांक ५० गुणांवर नोंदला गेल्यास विस्तार तर ५० गुणांखाली नोंदला गेल्यास आकुंचन झाल्याचे मानले जाते.

मागणीतील वाढ आणि वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) सुसूत्रीकरणासारख्या घटकांमुळे एकंदर व्यावसायिक परिस्थितीत सुधारणा झाली आहे. परंतु स्पर्धा आणि अतिवृष्टीमुळे वाढीवर परिणाम झाला, असे एचएसबीसीच्या मुख्य अर्थतज्ज्ञ प्रांजुल भंडारी म्हणाल्या.

सध्या परदेशातील विक्रीत वाढ झाल्याने भारतीय सेवांसाठी आंतरराष्ट्रीय मागणीत आणखी सुधारणा दिसून आली. सर्वेक्षणानुसार, विस्ताराचा दर स्थिर राहिला आहे, मात्र तो मार्चनंतरचा सर्वात कमकुवत पातळीवर नोंदवला गेला. जीएसटीतील सुधारणांमुळे किमतीवरील दबाव कमी झाला. उत्पादन खर्च आणि विक्री किंमत अनुक्रमे १४ आणि सात महिन्यांतील सर्वात कमी दराने वाढल्या आहेत. कंपन्यांना पुढील १२ महिन्यांत वाणिज्य घडामोडींमध्ये वाढ होण्याचा दृढ विश्वास असून, व्यवसायांच्या वाढत्या मागणीला पूर्ण करण्यासाठी कंपन्यांनी ऑक्टोबरमध्ये अतिरिक्त कर्मचारी भरती केल्याचे दिसून आले.

# देशाला जागतिक दर्जाच्या बँकांची गरज - अर्थमंत्री

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**



**मुंबई:** देशाला मोठ्या आणि जागतिक दर्जाच्या बँकांची आवश्यकता आहे. या संदर्भात रिझर्व्ह बँक आणि इतर बँकांशी सध्या चर्चा सुरू आहे, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन मुंबईत १२ व्या एसबीआय बँकिंग परिषदेला गुरुवारी संबोधित करताना प्रतिपादन केले.

उद्योगांना अधिक सुलभरित्या कर्जपुरवठा करण्याचे बँकांना निर्देश दिले असून वस्तू आणि सेवाकर (जीएसटी) दर सुसुत्रीकरणामुळे मागणी-पुरवठ्याचे आणि पर्यायाने उद्योगांकडून गुंतवणुकीचे चक्र कार्यान्वित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मात्र देशाला अनेक मोठ्या आणि जागतिक दर्जाच्या बँकांची आवश्यकता आहे. यावर भर देत त्या म्हणाल्या की, सरकारचे याकडे लक्ष आहे आणि त्या संबंधाने काम आधीच सुरू झाले आहे. मोठ्या बँकांच्या निर्मितीसाठी रिझर्व्ह बँकेशी चर्चा सुरू आहे.

खासगीकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून, सरकारने जानेवारी २०१९ मध्ये आयडीबीआय बँकेतील त्यांच्याकडून नियंत्रित ५१ टक्के हिस्सा भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसीला विकला. त्यानंतर, सरकार आणि एलआयसीने आयडीबीआय बँकेतील त्यांची हिस्सेदारीची धोरणात्मक विक्री करण्याची योजना जाहीर केली.

ऑक्टोबर २०२२ मध्ये, दोन्ही भागधारकांनी आयडीबीआय बँकेचे खासगीकरण करण्यासाठी गुंतवणूकदारांकडून इरादा पत्र मागवले होते आणि एकूण ६०.७२ टक्के हिस्सा विक्रीची योजना आखली आहे. यामध्ये सरकारचा ३०.४८ टक्के हिस्सा आणि एलआयसीच्या ताब्यात असलेला ३०.२४ टक्के हिस्सा विकला जाणार आहे. जानेवारी २०२३ मध्ये, केंद्र सरकारच्या 'दीपम' विभागाला आयडीबीआय बँकेसाठी अनेक इरादा पत्र प्राप्त झाले आहेत.

केंद्र सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे एकत्रीकरण देखील हाती घेतले आहे. बँकिंग क्षेत्रातील सर्वात मोठ्या एकत्रीकरणाच्या प्रक्रियेत, सरकारने ऑगस्ट २०१९ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील चार मोठ्या बँकांचे विलीनीकरण जाहीर केले, ज्यामुळे त्यांची एकूण संख्या २०१७ मधील २७ वरून, १२ पर्यंत कमी झाली.

# 'ईपीएफओ'कडे नवीन नोंदणी कर्मचाऱ्यांसह आस्थापनांनाही लाभदायी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई:** कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचा (ईपीएफ) लाभ न घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना, सामाजिक सुरक्षेच्या कक्षेत आणण्याच्या दृष्टीने आता केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्रालयाने प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेंतर्गत १ नोव्हेंबरपासून कर्मचारी नोंदणी कार्यक्रमाला सुरूवात केली आहे. या नोंदणीतून कर्मचारी आणि आस्थापनांना विशेष आर्थिक लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला असून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेमार्फत (ईपीएफओ) सर्व उद्योग आस्थापनांना त्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेत एक लाख रुपयांपर्यंत मासिक वेतन असलेल्या आणि कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेत पहिल्यांदा नोंदणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना १५ हजार रुपयांचा लाभ देण्यात येणार आहे. वर्षभरात सहा महिन्यांच्या अंतराने दोन हप्त्यांमध्ये तो लाभ दिला जाईल. या नोंदणीसाठी आस्थापनांनाही आर्थिक लाभ मिळणार आहे. पहिल्या नोंदणीबरोबरच योजनेत पुन्हा सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नोंदणीसाठी आस्थापनांना दर महिना प्रति कर्मचारी तीन हजार रुपयांचा लाभ दिला जाईल. हा लाभ दोन वर्षांसाठी लागू राहणार आहे.

आस्थापनांना 'ईपीएफओ'च्या संकेतस्थळावर जाऊन प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेसाठी नोंदणी करता येईल. त्याचप्रमाणे http:// pvmbry. epfindia. gov. in या दुव्यावरून ही नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संकेतस्थळावर दरमहिना 'ईसीआर' तपशील अचूक भरावा, जेणेकरून लाभ मिळण्यासाठी विलंब होणार नाही, असेही नमूद करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ कर्मचाऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरित केला जाणार आहे.

# 'एलआयसी'चा नफा सप्टेंबर तिमाहीत १०,०५३ कोटींवर




**मुंबई :** सरकारी आयुर्विमा कंपनी असलेल्या भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसीला सरलेल्या सप्टेंबर तिमाहीत १०,०५३ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला. नफ्यात वार्षिक आधारावर ३२ टक्क्यांची वाढ झाली आहे. देशातील सर्वात मोठ्या विमा कंपनीने गेल्या वर्षीच्या याच कालावधीत ७,६२१ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला होता. याआधीच्या जून तिमाहीत एलआयसीने १०,९५७.०५ कोटी रुपयांचा नफा नोंदवला होता. त्यातुलनेत सप्टेंबर तिमाहीत नफ्यात ७.८ टक्क्यांनी घसरण झाली आहे.

वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या सहा महिन्यांत एलआयसीचा निव्वळ नफा २१,०४० कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

# 'सेबी'चे सुकाणू गुंतवणूकदारांच्या सहभागवाढीसाठी पाऊल

## राखीव हिस्सा मर्यादा कमाल ३३ टक्क्यांवरून ४० टक्क्यांवर

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** भांडवली बाजार नियामक 'सेबी'ने म्युच्युअल फंड, विमा कंपन्या आणि पेन्शन फंड यांसारख्या देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांचा भांडवली सहभाग वाढवण्याच्या दृष्टीकोनातून पाऊल उचलले आहे. या नवीन नियमांमुळे 'आयपीओ'च्या माध्यमातून भांडवली बाजारात दीर्घकालीन संस्थात्मक गुंतवणूकदारांचा सहभाग वाढेल. ही सुधारणा येत्या ३० नोव्हेंबरपासून लागू होणार आहे.

अँकर अर्थात सुकाणू गुंतवणूकदारांसाठी समभाग वाटपाच्या मर्यादेत सुधारणा केली आहे. कोणत्याही कंपनीची प्रारंभिक समभाग विक्री होण्याआधी सुकाणू गुंतवणूकदारांसाठी त्यातील काही हिस्सा राखीव ठेवला जातो. सध्या विक्रीस खुल्या एकूण समभागांच्या कमाल ३३ टक्के समभाग सुकाणू गुंतवणूकदारांसाठी राखीव असतात. ती मर्यादा आता ४० टक्क्यांपर्यंत वाढवली गेली आहे. यामध्ये म्युच्युअल फंडांसाठी ३३ टक्के आणि विमा कंपन्या आणि पेन्शन फंडांसाठी उर्वरित ७ टक्के समाविष्ट आहे. जर विमा कंपन्या आणि पेन्शन फंडांसाठी राखीव ठेवलेले ७ टक्के हिस्सेदारी रद्द केली तर ती म्युच्युअल फंड कंपन्यांकडे वळती केली जाईल, असे 'सेबी'ने ३१ ऑक्टोबर रोजीच्या अधिसूचनेत म्हटले आहे.

याव्यतिरिक्त, कंपनीने आयपीओद्वारे सुकाणू गुंतवणूकदारांसाठी २५० कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याचा हिस्सा राखीव ठेवला असेल तर त्यात आता सुकाणू गुंतवणूकदारांची एकूण संख्या १० वरून १५ पर्यंत वाढवली गेली आहे. म्हणजेच अधिक गुंतवणूकदार आता समभाग खरेदीसाठी सहभागी होऊ शकतील.




हे पत्र **वैदेही ठकार** यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, ई -२५, एम.आय.डी.सी., वाळुंज, छत्रपती संभाजीनगर येथे छापून १६४, अंबर प्लाझा, स्टेशन रोड, अहिल्यानगर-४१४ ००१ येथे प्रसिद्ध केले. **संपादकीय/ जाहिरात/ वितरण** : १६४, अंबर प्लाझा, स्टेशन रोड, अहिल्यानगर-४१४ ००१. दूरध्वनी- ०२४१-२४५१९०७, २४५१५४४, फॅक्स : ०२४१-२४५१६०७. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर*** (* पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd. No. RNI 57133/94 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.